**महाराष्ट्र शासन**
**इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई**
**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी), महाराष्ट्र राज्य,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर -440022**
**Website:** www.vanarti.in **CIN: U84120MH2026NPL466492** **ईमेल-**:vanarti.info@gmail.com

जा.क्र.वनार्टी/नागपूर/आस्था/ 434/2026-2027 दिनांक :- 08/06/2026

## IBPS-PO/Banking/LIC AAO परीक्षा पूर्व ऑफलाईन प्रशिक्षण 2026-27 करीता योजनेचा तपशील

महाराष्ट्र राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमाती या प्रवर्गातील नॉन-क्रिमिलेअर गटातील विद्यार्थ्यांना वनार्टी मार्फत IBPS-PO/Banking/LIC AAO या परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी मोफत **ऑफलाईन व अनिवासी पद्धतीने प्रशिक्षण** देण्यात येणार आहे. त्याकरीता इच्छूक विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहे.

- **प्रशिक्षणाचा कालावधी - 6 महिने**
- **विद्यावेतन – 6,000/- प्रतिमाह (75% उपस्थिती असल्यास)**
- **आकस्मिक निधी 10,000/- (एकवेळ)**

➢ **योजनेच्या लाभासाठी पात्रता :**

1. विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा/असावी.
2. विद्यार्थी हा नॉन-क्रिमिलेअर गटातील विमुक्त जाती/भटक्या जमाती या प्रवर्ग यापैकी असावा/असावी.
3. विद्यार्थी हा पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेला असावा/असावी.
4. यापुर्वी वनार्टीच्या योजनांचा कोणत्याही स्वरुपात लाभ घेतलेला असेल, अशा विद्यार्थ्यांनी चालू योजनेसाठी पुन्हा अर्ज करु नये, अश्या विद्यार्थ्यांना सदर योजनेच्या लाभासाठी ग्राह्य धरल्या जाणार नाही. त्यांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाही.
5. प्रशिक्षणाकरीता लाभार्थी विद्यार्थ्यांची अंतिम निवड चाळणी परिक्षेद्वारे करण्यात येईल.
6. विद्यार्थ्यांची IBPS-PO/Banking/LIC AAO पूर्व परीक्षेच्या धर्तीवर व अभ्यासक्रमानुसार चाळणी परीक्षा घेण्यात येईल.
7. चाळणी परीक्षेत प्राप्त गुणांकनानुसार मेरीटच्या आधारे व आरक्षित जागांच्या प्रमाणात पात्र विद्यार्थ्यांची निवड यादी वनार्टीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.
8. चाळणी परीक्षेच्या वेळापत्रकाबाबत स्वतंत्रपणे वनार्टीच्या संकेतस्थळावर माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.
9. विद्यार्थ्यांचे वय किमान 20 वर्ष व कमाल 33 वर्ष तसेच दिव्यांगाकरिता 43 वर्ष पेक्षा जास्त असू नये.

- **प्रशिक्षणाचे स्वरुप :**
  1. सदर प्रशिक्षणाचा कालावधी हा 6 महिन्यांचा असेल.
  2. विद्यार्थ्यांना परीक्षेच्या अभ्यासक्रमानुसार प्रशिक्षण देण्यात येईल.
  3. प्रशिक्षण अनिवासी स्वरुपाचे असेल.
  4. प्रशिक्षण हे ऑफलाईन स्वरुपात असेल.

- **आरक्षण :**

  **सामाजिक प्रवर्ग व समांतर आरक्षण पुढीलप्रमाणे :**

| अ.क्र. | सामाजिक प्रवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | विमुक्त जाती (VJ-A) | 40% |
| 2 | भटक्या जमाती - ब (NT-B) | 22.50 % |
| 3 | भटक्या जमाती क (NT-C) | 22.50 % |
| 4 | भटक्या जमाती ड (NT-D) | 15 % |
| | एकूण | 100% |

- **संमातर आरक्षण पुढीलप्रमाणे :**
  1. प्रवर्गनिहाय महिलांसाठी 30% जागा आरक्षित आहे.
  2. दिव्यांगाकरिता 5% जागा आरक्षित आहे.
  3. अनाथांसाठी 1% जागा आरक्षित आहे.

- **अर्ज करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे:**
  1. आधार कार्ड
  2. जातीचे प्रमाणपत्र (Cast Certificate)
  3. वैध नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र (Non-Creamy Layer Certificate)
  4. पदवीचे प्रमाणपत्र/गुणपत्रिका
  5. दिव्यांगाचे प्रमाणपत्र (दिव्यांग असल्यास)
  6. अनाथ असल्यास दाखला (अनाथ असल्यास)

- **अर्ज कसा करावा,**
  1. वनार्टीच्या www.vanarti.in या संकेतस्थळावर जाऊन Notice Board मधील "Application for IBPS-PO/Banking/LIC AAO Training-2026-27" यावर जाऊन ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावा.
  2. अर्जासोबत तपशीलात नमुद सर्व कागदपत्रे स्वाक्षांकीत करून स्पष्ट दिसतील असे स्कॅन करुन जोडावे.
  3. विद्यार्थ्याने अर्जामधील दिलेली सर्व माहिती पूर्ण भरायची आहे त्याशिवाय योजनेकरिता नोंदणी अर्ज वैध मानले जाणार नाही.

- **अटी व शर्ती :-**

1. अर्ज करण्याचा अंतिम दि. 25/06/2026 राहील.
2. पोस्टाने किंवा ई-मेल व्दारे प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.
3. जाहिरात रद्द करणे, मुदतवाढ देणे, अर्ज नाकारणे व स्विकारणे याबाबतचे सर्व अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक, वनार्टी यांचे राहतील.
4. कोणत्याही माध्यमातुन व अंतीम निवड प्रक्रियेच्या तसेच प्रशिक्षणाच्या कोणत्याही टप्यावर विद्यार्थ्यांनी सादर केलेली माहिती चुकीची, दोषपूर्ण व दिशाभूल करणारी असल्यास अथवा विद्यार्थ्याने यापूर्वी वनार्टी मार्फत राबविण्यात येणाऱ्या कोणत्याही योजनेचा लाभ घेतल्याचे आढळल्यास तसेच महाराष्ट्र राज्य शासनाच्या 'सारथी' या संस्थेकडून योजनेचा लाभ घेतलेला असल्यास त्यांची निवड रद्द करण्यात येईल.
5. अर्ज भरतांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी आल्यास कार्यालयीन वेळेत केवळ वनार्टीच्या Call Centre वर संपर्क करावा.

- **संपर्क क्रमांक :-** 7887882026
- **E-mail Id :-** vanarti.info@gmail.com या ईमेलवर संपर्क साधावा
- **संस्थेचे संकेतस्थळ (Website)** :- www.vanarti.in

**स्वा-**
(प्रशांत वावगे)
**व्यवस्थापकीय संचालक (प्र.)**
वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था
(वनार्टी)